# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त ) (ISO:9001:2008)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला ,
49, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - 400 051

दूरध्वनी क्र. 26472122 / 1255 फॅक्स - 91-022-6513980

Email : secretary @ msbte.com Web : www.msbte.com


जा.क्रमरातंशिमं/का-50/प्रतिनिधी / 2011/ 1242 दिनांक- 5 MAR 2011

## कार्यालयीन आदेश

विषय- मंडळाशी संलग्न संस्थेच्या नियामक परिषदेवर ( Governing Council) मंडळाचा प्रतिनिधी नियुक्त करणेबाबत.

संदर्भ- दि. 17.2.2011 ची टिप्पणी.

मंडळाशी संलग्न संस्थेकडून नियामक परिषदेवर ( Governing Council) मंडळाचा प्रतिनिधी नियुक्त करणेबाबतची पत्रे थेट मंडळाकडे पाठविण्यात येतात. यापुढे मंडळाशी संलग्न सर्व संस्थांनी नियामक परिषदेवर (Governing Council) मंडळाचा प्रतिनिधी नियुक्त करणेबाबत पत्र थेट मंडळाकडे न पाठविता आपल्या विभागीय कार्यालय/उपविभाग यांचे कडे सादर करावेत.

मंडळाशी संलग्न संस्थातील नियामक परिषदेवर ( Governing Council) मंडळाचा प्रतिनिधी म्हणून मंडळामार्फत उपसचिव/प्रभारी अधिकारी संबंधित विभागीय कार्यालय/उपविभाग यांची नियुक्ती करण्यात येत आहे. सर्व उपसचिव व प्रभारीअधिकारी यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी स्वत: आपल्या विभागातील संस्थांच्या नियामक परिषदेच्या सभांना हजर रहावे. तसेच उपसचिव / प्रभारी अधिकारी अनुपलब्ध असल्यास त्यांनी संलग्न संस्थांच्या नियामक परिषदेवर (Governing Council) मंडळाचा प्रतिनिधी म्हणून सक्षम अधिका-याची नियुक्ती करावी असे आदेश देण्यात येत आहे.

(प्र. अं. नाईक)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई

प्रत :

1. मा संचालक, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-51 यांना माहीती करीता.
2. उपसचिव / प्रभारी अधिकारी, म. रा.तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे, औरंगाबाद, नागपूर व मुंबई उपविभाग यांना माहीती व आवश्यक कार्यवाही करीता.
3. प्राचार्य, मंडळाशी संलग्न सर्व संस्था यांना माहिती व पुढील कार्यवाही करीता.
4. पोर्टल मॅनेजर पुढील कार्यवाही करीता.